# प्रतिज्ञापत्र

''अरुणा ढेरे यांच्या 'मंत्राक्षर' व 'निरंजन' या काव्यसंग्रहांचा स्त्रीवादी दृष्टिकोणातून चिकित्सक अभ्यास'' या विषयावरील सदर लघुशोध-प्रबंध मी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या एम. फिल. (मराठी) पदविकेकरिता लिहिलेला आहे. हा शोध निबंध अथवा त्याचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही, कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण - सातारा

दिनांक ५ डिसेंबर २००८

श्रीमती संगीता विजय इंगवले
(अभ्यासक)
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

# ऋणनिर्देश

माझा लघुशोध-प्रबंध पूर्ण होत असताना मला अतिशय आनंद होत आहे. शिक्षण घेण्याची जिद्द आणि घरच्यांचा पाठिंबा यामुळे कोणत्याही अडचणीपुढे हात न टेकता येथपर्यंत शिक्षण पूर्ण केले.

**विषय निवडीमागील भूमिका** - बी. ए. ते एम. ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण करीत असताना मी अनेकवेळा कथा, कादंबऱ्या व कविता इ. वाङ्मय प्रकारांच्या कलाकृतींचे वाचन केले. याच काळात अरुणा ढेरे यांचे 'प्रकाशाचे गाणे' हे पुस्तक वाचनात आले. सोसणाऱ्या आणि संघर्ष करणाऱ्या प्रत्येकीचे चरित्र यामध्ये आहे. या पुस्तकामुळे स्त्री जीवनाकडे बघण्याचा माझा दृष्टिकोण बदलला. स्त्री साहित्याकडे मी चिकित्सक दृष्टीने पाहू लागले. स्त्रियांचे सोसणे, परिस्थितीचे चटके, सासरचा छळ, नातेसंबंधाचे विपरीतपण, उपेक्षा, जिद्द, समाजसेवा, अंधारातून त्यांनी उजेडाचा घेतलेल्या ध्यास या सगळ्या विषयी कुतूहल निर्माण झाले. लघुशोध प्रबंधासाठी एखाद्या विषयाचा सखोल अभ्यास करायचा असेल तर तो विषय स्त्री जीवनाशी निगडीत का नसावा ? असा मला प्रश्न पडला आणि सकारात्मक उत्तर मिळाले. त्यातूनच अरुणा ढेरे यांच्या कवितासंग्रहाचा चिकित्सक अभ्यास करण्याचे मी ठरवले. डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या कन्या असलेल्या डॉ. अरुणा ढेरे यांचे नाव मराठी साहित्यात विविध शाखांमध्ये निर्मिती करणाऱ्या कवयित्री-लेखिकांमध्ये अग्रक्रमाने घेतले जाते. लेखक-कवयित्री-समीक्षक असलेल्या अरुणा ढेरे यांच्या कवितांमधून व्यक्त होणारे स्त्री चित्रण माझ्या मनाला विशेष भावले. आधुनिक स्त्री जीवनाचे बदलते संदर्भ - भावविश्व - समाजचित्र समस्या या सगळ्याचा वेध या कवितेमध्ये पाहवयास मिळतो. या लघुशोध प्रबंधामध्ये अरुणा ढेरे यांच्या 'मंत्राक्षर' व 'निरंजन' या कवितासंग्रहाचा चिकित्सक अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केला आहे.

या लघुशोध प्रबंधाच्या पूर्ततेसाठी मला जे काही करावे लागले त्यात अरुणा ढेरे यांच्या भेटीचा आणि त्यांच्या साहित्य-संकलनाचा समावेश होता. त्यासाठी मी त्यांच्या घरी गेले होते. तेथे त्यांच्या आई व आत्या भेटल्या. अरुणा ढेरे घरी नसताना या ज्येष्ठ महिलांनी मला अत्यंत अगत्याची व आपुलकीची वागणूक दिली. प्रत्यक्ष अरुणा ढेरे यांची भेट मला मोलाची व अविस्मरणीय वाटते. त्यांच्या भेटीने, सहकार्याने व मार्गदर्शनाने मी उत्साहाने हे संशोधनाचे काम करू शकले.

या लघुप्रबंधासाठी मला मदत करणारे बरेचजण आहेत. मला मार्गदर्शिका लाभल्या त्या डॉ.सौ.नलिनी महाडीक यांच्या समर्थ मार्गदर्शनामुळेच मी हा शोधप्रबंध पूर्ण करू शकले. माझ्या अनेक

घरगुती अडचणींमुळे माझ्या हातून होणाऱ्या चुकांना त्यांनी समजून घेतले. त्यांच्या डोंगराएवढ्या उपकारांची जाणीव मला सतत राहील. त्यांच्या ऋणांतून मुक्त होण्याऐवजी त्यांच्या ऋणातच राहण्यात मला धन्यता वाटते.

माझे पती श्री. सुनील धनावडे व मुलगी संस्कृती यांच्या प्रोत्साहनामुळे हा अभ्यास मी करू शकले. माझे प्रेरणास्थान माझे वडील श्री. विजय इंगवले व आई सौ. विमल यांच्या आशीर्वादामुळे व कुटुंबियांच्या प्रोत्साहनामुळे हे काम मी करू शकले. कॉलेजमधील मराठी विभागातील डॉ. सौ. भुतकर, डॉ. शिवाजी पाटील, मानसी लाटकर यांनी मला थेअरी अभ्यासक्रमासाठी मार्गदर्शन केले. आमच्या कॉलेजचे प्राचार्य जे. जी. जाधव यांनी संशोधन कामाची चौकशी करून प्रेरणा दिली. या कामासाठी छत्रपती शिवाजी कॉलेज सातारामधील ग्रंथालयाकडून संदर्भ ग्रंथ, पुस्तके, नियतकालिके इ. साहित्य उपलब्ध झाले. या सर्वांची मी शतशः ऋणी आहे.

महाबळेश्वर गिरिस्थान कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चौधरी, माजी प्राचार्य विजयकुमार फरांदे, किसन वीर कॉलेजमधील राज्यशास्त्र विभाग प्रमुख श्री. डुबल सर, श्री. आंब्राळे, श्री. शिंदे, श्री.वारूणकर व सर्व सहकारी प्राध्यापक यांनी वेळोवेळी कामाची चौकशी करुन मला काम पूर्ण करण्यास प्रेरणा दिली. या सर्वांची मी ऋणी आहे. या शिवाय माझ्या ज्ञात, अज्ञात अशा अनेक शुभचिंतकांचा यामध्ये खारीचा वाटा आहे.

माझे श्रद्धास्थान कै. आण्णा महाबळेश्वर व कै.स्वराज यांची आठवण प्रकर्षाने होत आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

सदर प्रबंधाची आकर्षक बांधणी व कॉम्प्युटर टायपिंग अत्यंत कमी वेळेत करुन देणारे मे.रिलॅक्स सायक्लोस्टायलिंग, साताराचे श्री. मुकुंद ढवळे व त्यांचे सहकारी यांचा मी मन:पूर्वक आभारी आहे.

ठिकाण - सातारा

दिनांक

**श्रीमती संगीता विजय इंगवले**